# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## Maharashtra Industrial Development Corporation

(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.

Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
☎:०२२-४७४८८३१२, ४७४८४६७९/९९

Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☎: +९१-०२२-४०१६१४५१/५४ (022-40161451/54)

www.midcindia.org


क्रमांक: मऔविम/मव्य(भूमी)/P245612 दिनांक: 10/02/2026

## परिपत्रक

**विषय : सुविधा क्षेत्रातून भूखंड वाटप करणेकरीता अर्ज करावयाची कार्यपध्दती.**

**संदर्भ: (१) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/पी२०५९२५, दिनांक १५.०३.२०२४**
**(२) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/पी११४०३४, दिनांक १३.०८.२०२४**

महामंडळाच्या संदर्भिय दिनांक १५.०३.२०२४ व दिनांक १३.०८.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये शासकीय व निमशासकीय संस्थांना सदर परिपत्रकामध्ये नमूद दरानुसार भूखंडाचे वाटप ऑनलाईन पध्दतीने करण्यात येते. महामंडळाने परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/पी२२१३०९, दिनांक १७.१०.२०२५ अन्वये निर्गमित केलेल्या एमआयडीसी औद्योगिक भूखंड वाटप धोरण (MIDC Industrial Land Application and Allocation Policy — MILAAP) मधील (A) विना-निविदा सरळ पध्दतीने औद्यागिक भूखंड वाटप (Direct Allotment without Bidding) — अतिमहत्वाचे आणि शासनाचे प्रकल्प अंतर्गत सोयी सुविधा तसेच दिनांक ०९.०२.२०१०, १५.०३.२०२४ व १३.०८.२०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार सवलतीच्या दराने वाटपाबाबत धोरण आहे. तथापि, शासकीय तसेच निमशासकीय संस्थांना सदर मिलाप प्राणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे सद्यस्थितीत शक्य होत नसून अर्ज प्रलंबित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याअनुषंगाने शासकीय / निमशासकीय संस्थांना महामंडळाच्या दिनांक ०९.०२.२०१०, १५.०३.२०२४ व १३.०८.२०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार तसेच CDCPR-२०२३ मधील अनुज्ञेय सोयी-सुविधा वापराकरिता सोयी-सुविधा क्षेत्रातून भूखंड वाटप

करताना त्यांचेकडुन ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्विकारुन महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

( पी. वेलरासू, भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुख्यालय, मुंबई
(२) मुख्य अभियंता (पुणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर)
(३) महाव्यवस्थापक (भूमी/ विधी/भूसंपादन/मा व तं /जनसंपर्क/ मबवि/डीएमआयसी/पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/छत्रपती संभाजीनगर/ नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ, मुंबई / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.